# प्रेसनोट

दि. २४/०२/२०२३

**जलसंपदा विभागातील भामा आसखेड सिंचन व्यवस्थापन, उप विभाग — करंजविहीरे येथील उप विभागीय अधिका-यावर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| गुन्हा नोंद क्रमांक | शिवाजीनगर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम — ७. |
| तक्रारदार | पुरूष, वय - ५३ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | तुळशीदास आश्रु आंधळे, वय ५७ वर्ष उप विभागीय अधिकारी, वर्ग-१, भामा-आसखेड सिंचन व्यवस्थापन, उप विभाग - करंजविहीरे, ता. खेड, जलसंपदा विभाग, पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ७,००,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ३,५०,०००/- रुपये |
| पडताळणी दिनांक | २३/०२/२०२३ |
| सापळा दिनांक | २४/०२/२०२३ रोजी सायंकाळी |

ठिकाण :- मोदी बाग बिल्डींगच्या आवारात, मोदी बाग, शिवाजीनगर, पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचा जमीन खरेदी-विक्री तसेच जमीन / प्लॉट डेव्हलप करण्याचा व्यवसाय असून त्यांची खेड तालुक्यातील कोळीए येथील जमीनीचे सपाटीकरण व डेव्हलपमेंटचे काम सुरु असताना जलसंपदा विभागातील भामा आसखेड सिंचन व्यवस्थापन उपविभागाचे डेप्युटी इंजिनियर तुळशीदास आंधळे यानी कामाचे ठिकाणी भेट दिली व पाहणी करुन, 'पूर रेषेच्या आतमध्ये सपाटीकरण / डेव्हलपमेंटचे काम केले असून, रितसर कारवाई करणार असलेबाबत कळविले' व कारवाई न करणेसाठी लोकसेवक आंधळे यांनी सात लाख रुपयांची लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता लोकसेवक तुळशीदास आंधळे यांनी तक्रारदार यांचेकडे ७,००,०००/- रुपयांची मागणी करुन त्यापैकी ३,५०,०००/- रुपये (साडेतीन लाख रुपये) आज दि. २४/०२/२०२३ रोजी घेवून येण्यास सांगून ती लाच रक्कम स्वीकारल्यावर त्याना ताब्यात घेण्यात आले असून, शिवाजीनगर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक संदिप व-हाडे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.